# जिल्हा निवड समिती, गडचिरोली.

जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.

## तलाठी/ लिपिक टंकलेखक पदाच्या मुळ प्रमाणपत्र पडताळणी सबंधी

## सुचना.

-----------oooo-------------

तलाठी/ लिपिक टंकलेखक पदासाठी दिनांक ३०.१०.२०११ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणानुसार, ज्यांचे नांव तलाठी/ लिपिक टंकलेखक पदासाठीच्या निवड यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. त्यांची निवड अंतिम करण्याचे दृष्टीने, त्यांनी आवेदनपत्रासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राची/ कागदपत्रांची मुळ प्रमाणपत्रावरुन पडताळणी करणे आवश्यक आहे. याबाबतची तलाठी व लिपिक टंकलेखक संवर्गाची निवड यादी जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोलीचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर व कार्यालयाची वेबसाईट www.gadchiroli.nic.in यावर दिनांक २८.१२.२०११ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

यास्तव, उपरोक्त निवड यादीत ज्या उमेदवाराचे बैठक क्रमांक व नांव समाविष्ट आहेत, त्या सर्व उमेदवारांनी आवेदन पत्रासोबत जोडलेले त्यांचेकडील संपूर्ण मुळ कागदपत्र/ दस्तऐवज व त्याच्या दोन साक्षंकित प्रति यासह कागदपत्र पडताळणी करीता **दिनांक ०५.०१.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली** येथे न चुकता उपस्थित रहावे. याबाबत, निवड यादीत समाविष्ट असलेल्या सर्व उमेदवारांना त्याच्या पत्त्यावर स्वतंत्र पत्राद्वारे (पोस्टाने) या कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. पोस्टाच्या दिरंगाईमुळे वा अन्य कारणांने, सदरचे पत्र उमेदवारास वेळेत प्राप्त झाले नाही, तरीसुध्दा उमेदवारांनी या सुचनेच्या आधारे कागदपत्र/ दस्तऐवज पडताळणीकरीता न चुकता वेळेवर हजर रहावे.

तलाठी/ लिपिक टंकलेखक पदावर निवड अंतिम होणेच्या दृष्टीने, **कागदपत्र/ दस्तऐवज पडताळणीकरीता वरीलप्रमाणे संपुर्ण मुळ कागदपत्र व त्याच्या दोन साक्षांकित प्रति यासह उपस्थित राहणे अनिवार्य आहे.** मुळ कागदपत्र तपासणीच्या वेळी कोणत्याही कारणास्तव अपात्र आढळल्यास/ हजर न झाल्यास, उमेदवाराची निवड ताबडतोब रद्द करण्यात येईल/ होईल. दस्तऐवज पडताळणीस अनुपस्थित उमेदवाराबाबत या कार्यालयाकडून नंतर कुठल्याही स्वरुपाचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच अनुपस्थित उमेदवाराच्या कुठल्याही तक्रारीची नंतर दखल घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, गडचिरोली.

\\tsclient\D\Bharti.11\Bharti.Cor..rtf